MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue August 2019

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास विषया अंतर्गत राष्ट्रीय चर्चासत्र



# मराठवाडा प्रदेशाचा प्रवाहित होणारा इतिहास

(इ.स.पूर्व ते इ.स.२०१९)

संपादक
डॉ.मुकूंद अ.देवर्षी

53) मराठवाडा मुक्ती संग्राम व आजचा मराठवाडा
डॉ.किसन पवार. जि.बीड ||166

54) वैभवशाली कंधार
प्रा.डॉ. दिगंबर ज.सोनवणे, जि.अहमदनगर ||168

55) मराठवाडा मुक्तीसंग्रामात स्वामी रामानंद तीर्थ यांचे राजकीय योगदान...
प्रा.देवशेट्टे सुरेश मनोहरराव, मुखेड ||170

56) मराठवाडयाचा ऐतिहासिक मागोवा
प्रा.डॉ.अशोक गंगाराम साबणे, जि.नांदेड ||174

57) मराठवाडा प्रदेशाच्या विकासातील समस्या व उपाय
प्रा. डॉ. उद्धव उमाजी राऊत, वसमत ||177

58) हैद्राबाद मुक्ती संग्रामात मराठवाड्यातील महिलांचे योगदान
प्रा.डॉ. कदम एस.आर., बनसारोळा ||179

59) श्री क्षेत्र नारायणगडावरील वारकरी संप्रदाय आणि संत परंपरा
प्रा. जानवळे राजकुमार सोनलाल, बीड ||181

60) सिंघण यादव : लष्करी धोरण व विजयी अभियान
प्रा.महेंद्र पी. देशपांडे, जि.बीड ||183

61) सातवाहनांचा नाण्यांमधून प्रतिबींबीत होणारा इतिहास
प्रा.प्रकाश रेशमाजी वाणी, औरंगाबाद ||186

62) मराठवाड्यातील समर्थ मठ परंपरेतील परंडा येथील हंसराज स्वामी मठ : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप
प्रा.डॉ.कुलकर्णी जयश्री रमेश, उस्मानाबाद ||188

63) मराठवाड्यातील प्राचीन राजकिय सत्ता
डॉ.के.एल.गिरमकर, जि.अ.नगर ||189

64) १९३८ चा आर्यसमाजाचा सत्याग्रह आणि मराठी वर्तमानपत्रांचे कार्य
प्रा.डॉ. प्रशांत देशमुख, जि. जळगांव ||191

65) मराठवाडा मुक्तीसंग्रामात महिलांचे योगदान
फड अजय श्रीधर, जि.लातुर ||201

www.vidyawarta.com/03 __ http://www.printingarea.blogspot.com

62

# मराठवाड्यातील समर्थ मठ परंपरेतील परंडा येथील हंसराज स्वामी मठ : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ.कुलकर्णी जयश्री रमेश**
इतिहास विभागप्रमुख,
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय उस्मानाबाद

**प्रस्तावना :-**

**प्रादेशिक इतिहास :-**

राष्ट्रीय पातळीवरचा इतिहास खऱ्या अर्थाने लिहावयाचा असेल तर सर्वप्रथम त्या राष्ट्राचा स्थानिक इतिहास लिहावयास हवा. त्याकरिता स्थानिक इतिहासाचे नव्या दृष्टिकोनातून संशोधन व शास्त्रशुध्द लेखन व्हावयास हवे. त्या-त्या परिसरातील सामाजिक धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय गोष्टी प्रकाशाता यावयास हव्यात, हाच स्थानिक इतिहासाचा हेतू असतो.

मराठवाडा हा महाराष्ट्राचा प्रादेशिक भाग असून येथील स्थानिक इतिहास संशोधनावर मागील ३०-४० वर्षात बराच भर दिला गेला. त्यामध्ये मराठवाड्यातील धार्मिक इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न अनेकांनी केलेला दिसतो. त्यामध्ये इतिहास अभ्यासक साहित्यिक, धार्मिक विवेचकांबरोबरच प्रसारमाध्यमे व त्यांचे प्रतिनिधीही समाविष्ट आहेत. या सर्वांच्या अथक परिश्रमातून मराठवाड्यातील इतिहास साधनांचे, स्थळांचे संशोधन व वर्गीकरण शक्य झाले. शिवाय त्यांचे सूत्रबध्द संकलनही शक्य झाले. त्यातून मराठवाड्यातील विशिष्ट परंपरा, ज्या राष्ट्रभरातील परंपरांशी संलग्नित आहेत त्या पुढे आल्या.

महाराष्ट्रातील समर्थ संप्रदायाच्या मठ परंपरेतील अनेक मठ मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात आढळून येतात. त्यातील डोमगांवचा कल्याणस्वामी मठ, परंड्याचा कल्याणस्वामी मठ, हंसराज स्वामींचा मठ, उस्मानाबादचा अनंतदास महाराज मठ या मठांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. त्यामधील परंड्याच्या हंसराजस्वामी मठाचेऐतिहासिक व सामाजिक महत्व जाणण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधलेखात केला आहे.

**विषय मांडणी :-**

हंसराजस्वामी - उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा या तालुक्याच्या गावामध्ये समर्थ रामदासी परंपरेतील संत श्री नारायण उर्फ हंसराजस्वामी हे 'शब्दे परेच निष्णात' असे ज्ञानी संत इसवीसनाच्या १९व्या शतकात (इ.स.१९२५)१ मध्ये होऊन गेले. त्यांचा जन्म श्रावण महिन्यात शके १७२० मध्ये गंगाधरपंत व रेणुकाबाई यांच्या पोटी परभणी येथे झाला.२ सावकारी घराण्यातील गंगाधरपंतांनी सावकारी न करता पेशकारीचे काम पत्करलते. पण लवकरच नोकरी गेल्याने त्यांच्या आयुष्यात भटकंती सुरू झाली. मधला मुलगा नारायणचे यात काळात कोयाळ येथील लक्ष्मी कुलकर्णी या मुलीशी लग्न झाले. आपल्या मातूलगृही हिंगणी येथे असताना नारायणांनी अर्थाजनासाठी गृहत्याग केला. व्यापार, नोकरीच्या निमित्ताने ते सूरत, ग्वाल्हेर येथे फिरले. पण फारसे यशस्वी न झाल्याने ते परभणीस परतले. तेथे त्यांना नोकरी मिळाली. पण आधीच विरक्त असलेले नारायणराव सततच्या अस्थैर्यामुळे परमार्थाकडे आकृष्ट झाले. त्रिकाल संध्या, वैश्वदेव, नैवेद्य, सहस्त्रानामादि स्त्रोत्रपाठ, भजन, शेजारती, अध्यात्म ग्रंथावलोकन, भगवंत नामाचा निदिध्यास इ.नित्य निष्ठेने चालू होते. पण गुरूकृपेशिवाय ज्ञानप्राप्ती होत नाही म्हणून ते पाथरी येथील ब्रह्मनिष्ठ स्वामींकडे गेले व त्यांच्या आज्ञेनुसार लक्ष्मीपंत दिवाणजी यांच्याकडे गेले. त्यांना शेवाळे येथे नारायणांना गुरू उपदेश/अनुग्रह दिला. तो साधारणतः शके १७४९-५० मध्ये.३ यानंतर लवकरच त्यांचा नवजात पुत्र व पत्नी यांचा अकास्मिक मृत्यू झाल्यामुळे ते कुटुंबजीवनातून मुक्त झाले आणि गुरूआज्ञेने भ्रमंतीस निघाले. पानापूर (माहूरगड) येथे राहून पुन्हा शेवाल्यास आले. तेथे गुरू आज्ञेनुसार 'गुरूशक्तिसार' हा ग्रंथ शके १७५४ मध्ये लिहिला.४ त्यानंतर पुन्हा संपूर्ण मराठवाडाभर भ्रमंती केली.

**साहित्य निर्मिती :-** डोमगाव मुक्कामी (ता.परंडा) आल्यावर त्यांनी श्री संकेत कुबडी, आगमसार, सदाचार, पूर्वारंभ-गाथा हे ग्रंथ लिहिले. शेवटी परंडा येथे शिष्यांनी बांधलेल्या मठात त्यांनी वास्तव्य केले. परंडा मुक्कामी त्यांनी 'कथा-कल्पकता, चूडालाख्यान, वेद नावाची पदे व अभंग, हंसपध्दती' हे ग्रंथ शिवगीते वरील 'वेदेश्वरी' आद्यशंकराचार्यांच्या लघुवाक्यवृत्तीवरील 'वाक्यवृत्ती', इशावास्योपनिषदावरील 'वेदाज्ञा' हे ग्रंथ लिहिले.५

हंसराज स्वामीच्या लेखन व प्रबोधनामुळे परिसरातील समाज त्यांच्याकडे आकृष्ट झाला. आजही त्यांचा फार मोठा शिष्यपरिवार परंडा ते परभणी परिसरात आढळतो. हंसराज स्वामींनी समर्थ रामदासांचा उपदेश जनमानसात पोहोचवताना

"दासबोध स्वल्प वाटे ज्या नरा,
तो जाणवा आत्महत्यारा"

येथे आणि सूक्ष्म विचारा फडके होतो.६ ही भूमिका मांडली. शेवटी वेशाख शुध्द अष्टमी शके १७७७ रोजी त्यांनी परंडा येथील मठातच देह ठेवला. त्यानंतर त्यांच्या शिष्यगणांनी स्थापन केलेल्या श्री हंस मंडळाने त्यांचे साहित्य प्रकाशित केले. त्यांचे पटशिष्य रघुनाथराव गोडबोले व त्यानंतर एकनाथराव निलंगेकर मास्तरांनी पुढाकार घेऊन त्यांची चित्रित प्रतिकृती सर्वांसमोर आणली.७

**हंस परंपरा**

१) श्री आदिनारायण २) श्री ब्रह्मदेव ३) श्री वाशिष्ठ ४) श्री राम ५) श्री समर्थ रामदास स्वामी ६) श्री उध्दवस्वामी ७) श्री माधवस्वामी ८) श्री रुद्रामबाबा ९) श्री नागनाथ हंस १०) श्री लक्ष्मणहंस ११) श्री नारायणहंस उर्फ हंसराज स्वामी -८-

अशा प्रकारे हंसराजस्वामी हंसपरंपरेतील (समर्थ संप्रदायातील) ११ वे हंस बनले.

**सारांश :-**

मराठवाड्यातील समर्थ परंपरेतील संत श्री हंसराज स्वामी यांचे परंडा, भूम, परभणी परिसरातील समाज प्रबोधनाचे कार्य हे परंडा येथील त्यांच्या मठात केंद्रीभूत झालेले दिसते. त्यांनी केवळ समर्थ रामदासांच्या साहित्यातील नव्हे, तर इतर संत साहित्याचीही बदलत्या काळानुरूप समाजप्रबोधनासाठी ग्रंथरुपाने मांडणी केली. त्यांच्या जीवित कार्याचा अभ्यास सखोलपणे होऊन त्याची पुनर्मांडणी होणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्याच विचारांच्या डोमगावचे कल्याण स्वामी, उस्मानाबादचे अनंतदास महाराज यांच्या कार्याचा लेखाजोखा घेणे गरजेचे आहे. शिवाय अशा मठपरंपरेचा सांगोपांग अभ्यास करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

१) संपादक : महादेवशास्त्री जोशी - भारतीय संस्कृतिकोश खंड १० वा - भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे-२००९ पृष्ठ क.७४२

२) कित्ता

३) भारत गजेंद्रगडकर, गोविंद हरी दंडवते-बालाघाटची साद- रसिक प्रकाशन, उस्मानाबाद-२००३ पृष्ठ क्र-७३

४) कित्ता

५) संपादक : महादेवशास्त्री जोशी - भारतीय संस्कृतिकोश खंड ११ वा - भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे-२००९ पृष्ठ क.७४३

६) प.प.हंसराजस्वामी - श्री संकेत कुबडी - सत्कार्योत्तेजक सभा, धुळे आणि हंस मंडळ, परंडा - २००९, पृष्ठ क्र.४

७) भारत गजेंद्रगडकर, गोविंद हरी दंडवते - बालाघाटची साद - रसिक प्रकाशन, उस्मानाबाद - २००३, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.७५

८) कित्ता - पृष्ठ क्र.७६

63

# मराठवाड्यातील प्राचीन राजकिय सत्ता

डॉ.के.एल.गिरमकर
इतिहास विभाग प्रमुख,
के.जे.सोमैय्या कॉलेज, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अ.नगर

**********

भौगोलीक दृष्ट्या मराठवाड्यातुन वाहणारी गोदावरी ही सर्वात मोठी नदी आहे. दक्षिण भारतातील गोदावरी ही नदी मराठवाड्याला मिळालेली एक देणगीच आहे. उस्मानाबाद व लातूर सोडून मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातून ही नदी वाहते. त्यामुळे गोदावरीच्या नदी किणारी प्राचिन काळापासून विविध संस्कृतींचा उगम झालेला दिसून येतो. आश्मयुगापासून ते आधुनिक काळा पर्यंत मानवी जीवनाची वाटचाल गोदावरी नदीच्या किणारी झाल्याचे स्पष्ट होते.

मानवी उत्क्रांतीच्या आवस्थेपासून गोदावरी नदीच्या किणारी वसाहती निर्माण झाल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. प्राचिन मानवी संस्कृतीचे अवशेष मराठवाडाभर विखुरलेली आढळतात. यात प्रामुख्याने घटोत्कच लेण्यांचा परिसर, पितळखोरा परिसर, नांदेड परभणी मधील काठारवाडी, भितरगाव, महागाव, बीड, आंबेजोगाई इ. ठिकाणी मिळालेल्या अवशेषा वरुन मानवी वसाहतींची कल्पना येते.

मराठवाड्यातील सर्वात मोठी सत्ता म्हणून सातवाहनांचा उल्लेख करता येईल. सातवहन राज्यांची माहिती तत्कालीन अनेक धर्मग्रंथ त्यात प्रामुख्याने जैन साहित्य, बौध्द साहित्य, परकिय प्रवासी वर्णने यातून मिळते. सातवहन काळात कार्ले, भाजे, जुन्नर, पितळखोरा, अजिंठा, नाशिक इ. ठिकाणी बौध्द धर्मीयांच्या अनेक लेण्या निर्माण झाल्या या लेण्यांमधून समाजाचे धार्मीक सामाजिक, आर्थिक रुप दिसून येते. सातवहन राज्याच्या उदयामुळे मराठवाड्याच्या राजकिय आणि सामाजिक जीवनात अनेक बदल घडून आलेले दिसतात. सातवहनांची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) असल्याचे दिसून येते. सातवहन कालीन असंख्य नाही मातीच्या वस्तु शिलालखे मराठवाडाभर विखुरलेल्या स्वरुपात आढळतात. पैठण ही सातवहनांची राजधाणी आहे असे टॉलेमीने आपल्या ग्रंथात म्हटले आहे. सातवहन घराण्यात जे प्रमुख राजे झाले त्यात प्रामुख्याने सिमुक कृष्णा, वेदश्री, सातकर्णी प्रथम, शैलश्री,

सातकर्णी द्वितीय, मेघस्वामी, राजाहाल, गौतमी पुत्र सातकर्णी इ. राजे होवून गेले. सातकर्णी वैद्यीक धर्माचे अनुयायी होते. त्यांनी दोन अश्वमेध यज्ञ केलेले होते. सातकर्णीने केलेल्या यज्ञाची माहिती त्याची पत्नी राणी नागणिका हिने जुन्नर जवळील नाणे घाटात केली आहे. सातकर्णी पराक्रमी असल्यामुळे नंतरच्या राज्यांनी आपल्या नावापुढे सातकर्णी नाव घेतल्याचे दिसते. सातवहन राज्यात जगभरातून व्यापारी व्यापारासाठी येत असत. जगभरातील संपत्तीचा ओघ हा त्या काळी भारतातकडे सुरु झाला होता. त्यातही अनेक व्यापारी व्यापारासाठी सातवहन राज्यात येत होते.

सातवहन काळात समाज सहिष्णु होता. हिंदू व बौध्द या दोन्ही धर्माचे अनुयाई सातवहन राज्यात रहात होते. यक्ष पुजेला समाजात महत्वाचे स्थान होते. सातवहन कालीन लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा होता. कारण अनेक ठिकाणी झालेल्या उत्खननात धान्याचे अवशेष मिळाले आहेत. तांदुळ, गहू ज्वारी, कापूस ही पिके सर्वत्र घेतली जात होती. सात वाहनांनी वास्तु कलेमध्ये परमोच्च स्थान प्राप्त केलेले दिसते. पितळखोरा या ठिकाणी लेणी खोदल्याचे दिसते. या लेण्या यक्ष लेण्या म्हणून प्रसिध्द आहेत. तेथील स्थंभावर चित्र काढलेले आहेत. त्याच प्रमाणे भारतीय कलेचे सुवर्ण पान म्हणून अजिंठा लेण्यांचा गौरव केला जातो. तेथील चित्रकला आजही पर्यटकाचे आकर्षनाचा केंद्रबिंदू आहे. या लेण्या साधारणपणे इ.सन पुर्व १०० ते १५० च्या दरम्यान खोदल्या गेल्या असाव्यात सातवहन सत्ता नष्ट झाल्या नंतर मराठवाडाभर क्षक, क्षत्रप, अभिर, वाकाटक इ.छोट्या मोठ्या सत्ताधिशांनी राज्य केले परंतु यांना सत्ता जास्त कालावधी पर्यंत टिकवता आली नाही.

इ.सन ८ व्या शतकात मराठवाडाभर राष्ट्रकुट सत्तेचा उदय झाला त्यांची राजधानी वेरुळ येथे होती. दंतीदुर्ग याने राष्ट्रकुट सत्तेची स्थापना केली असे मानले जाते. त्यानंतर काही प्रमुख पराक्रमी राजे झाले, ज्यामध्ये कृष्ण प्रथम, गोविंद द्वतीय, ध्रुव, अमोघ वर्ष हे राष्ट्रकुट राजे धर्म सहिष्णु होते. शिव, विष्णु, महालक्ष्मी या देवतांची पुजा ते करीत होते. अनेक देवळे त्यांनी बांधली हिमालया पासून ते कन्या कुमारी पर्यंत साम्राज्य विस्तार केला होता. राष्ट्रकुट राजे कलांचे आश्रयदाते होते. वेळूरलची लेणी मरावाड्यातील कलावंतांनी तयार केली आहे. राष्ट्रकुटा नंतर मराठवाड्यामध्ये चालुक्य राज्यांनी आपली सत्ता प्रस्थापित केली. विजापूर जिल्ह्यातील बदामी (वातापी) येथे इ.सन ५४३ मध्ये पुलकेशी पहिला याने किल्ला बांधुन राजधानी बनविली या घराण्यातील सर्वात पराक्रमी राजा पुलकेशी द्वितीय याचा उल्लेख चिनी प्रवासी ह्यु एन संगाने केला आहे. त्याच्या राज्याच्या सिमा नाशिक पर्यंत होत्या. राज्या विजयादित्य याच्या कासार शिरसी येथे सापडलेल्या दानपत्रात चालुक्यांनी मराठवाड्यातून कर्नाटकात स्थलांतर केल्याचे वृत्त आहे. चालुक्यांच्या शाखा वेगवेगळ्या प्रदेशात स्थिरावल्या त्यात प्रामुख्याने बदामीने चालुक्य वातापीचे चालुक्य, मराठवाड्यातील अनेक सुरेख मंदिरे चालुक्या राज्यांच्या काळात बांधली गेली. अजिंठा लेण्यातील काही कलाकृती चालुक्य राज्यांनी केल्या आहेत. आंबेजोगाई, लातूर, धाराशिव धर्मापूरी इ. शहरांचा विकास चालुक्य राज्यांच्या काळात झाला.

चालुक्यांनंतर यादव घराण्याची सत्ता मराठवाड्यामध्ये सुरु झाली. यादव घराण्याने मराठवाड्यावर दोनशे वर्ष राज्य केले. सातवहना नंतर संपुर्ण मराठवाडा ताब्यात घेणारे यादव हे दुसरे आणि अखेरचे हिंदु राजघराणे होते. यादव घराण्यात काही प्रमुख राजे झाले. ते पुढील प्रमाणे भिल्लम, कृष्ण, सिंघन, महादेव, रामचंद्र इ. यादव काळात आशिया व आफ्रिका मधून अनेक व्यापारी मराठवाड्यात येत असत. यात घराण्याने आपली राजधाणी देवगिरी येथे स्थापन केली. यादव राज्यांच्या काळात मराठवाड्यातील पैठण लातूर देवगिरी ही शहरे व्यापारासाठी प्रसिध्द होती. मराठवाड्याचा व्यापार गुजरात तेलंगना, कर्नाटक, केरळ इत्यादी प्रांताशी चालत असे. पैठण मधील पैठण्यांना मोठ्या प्रमाणात बाहेरच्या देशांमध्ये मागणी होती. यादव काळातच मराठीच्या लोकभाषेमध्ये वाङमय निर्मीती करण्याची परंपरा नाथ संप्रदाय, महानुभव संप्रदाय, वारकरी संप्रदाय इ. चालविली. चक्रधर स्वामींपासून मुक्तेश्वरापर्यंत या सर्वांनी मराठी भाषेमध्ये जी भर घातली ती यादव काळात सुध्दा चालू होती असे दिसते.

**निष्कर्ष :-**

प्राचीन काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत राजकिय सत्तेचे केंद्र मराठवाड्यामध्ये होते. शेकडो वर्ष सत्तेच्या केंद्रभागी राहिल्यामुळे या परिसराचा आर्थिक विकास झाला होता. त्याच बरोबर कला, साहित्य, चित्रकला, स्थापत्य व्यापारी आणि उद्योग क्षेत्रात या परिसराने जागतीक स्थरावती आपले स्थान निर्माण केले होते.

**संदर्भग्रंथ**

१. Marathawada under the Nizam P.V. Kate

२. हैद्राबादचा मुक्ती संग्राम, उत्तम सुर्यवंशी, आण्णाराव टाकळगव्हाणकर.

३. मराठवाड्याचा इतिहास, डॉ.सोमनाथ रोडे.

४. प्राचिन भारत इतिहास व संस्कृत, अ.रा.कुलकर्णी.

५. प्राचिन भारत, प्रभाकर देव.

६. पैठण दर्शन, रा.श्री.मोरवंचीकर.

७. यादवकालीन महाराष्ट्र, मु.ग.पानसे.

८. मराठवाड्याचे कालवैभव, प्रा.म.श्री.माटे.

९. महाराष्ट्र आणि मराठे, सेतू माधवराव पगडी.

१०. महाराष्ट्र संस्कृती, पु.ग.सहस्त्रबुध्दे.